# प्रेसनोट

दिनांक ०९/०१/२०२६

**वनपरिमंडळ कार्यालय, खर्डी, ता. शहापूर, जि. ठाणे यांचे कार्यालयातील लोकसेवक १) श्री. भगवान जयराम भोईर, वय ५७ वर्षे, परिमंडळ वनअधिकारी (काष्टी), (वर्ग–३ ) यांना सापळा कारवाई करून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांनी लाच रक्कमेसह ताब्यात घेतले.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **ठाणे** |
| **स्टेशन डायरी नोंद क्र.** | शहापूर पोलीस स्टेशन, ठाणे ग्रामीण स्टेशन डायरी नोंद क्र. १६/२०२६, वेळ १६.२१ वा. |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | **१) श्री. भगवान जयराम भोईर, वय ५७ वर्षे, परिमंडळ वनअधिकारी (काष्टी), (वर्ग–३) (ताब्यात)**<br>**२) श्री. नितेश हुकूमचंद राठोड, वय ३८ वर्षे, वनरक्षक (वासिंद), (वर्ग–३) (पाहिजे)** |
| मागितलेल्या लाचेची **रक्कम** | ३,००,०००/–रूपये |
| तडजोडीअंती स्विकारलेल्या **लाचेची रक्कम** | २,१०,०००/–रूपये. |
| **थोडक्यात हकीगत** | यातील तक्रारदार यांचे स्वत:चे व त्यांचे सहकारी यांचे एकुण सहा मालवाहू ट्रक काष्टी राउंड मधील वन विभागातून वाहतुक करुन देण्यासाठी लोकसेवक १) भगवान जयराम भोईर, परिमंडळ वनअधिकारी व लोकसेवक २) नितेश हुकूमचंद राठोड, वनरक्षक यांनी प्रत्येक ट्रकचे ७५,०००/–रू. प्रमाणे सहा मालवाहू ट्रकचे एकुण ४,५०,०००/– रु.ची मागणी केलेबाबत तक्रार प्राप्त होती.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०५/०१/२०२६ रोजी करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये वनपरिमंडळ कार्यालय काष्टी, खर्डी येथील कार्यालयातील लोकसेवक १) भगवान जयराम भोईर, परिमंडळ वनअधिकारी व लोकसेवक २) नितेश हुकूमचंद राठोड, वनरक्षक यांनी तक्रारदार यांचेकडे काष्टी राउंडमधील वन विभागातून मालवाहू ट्रक वाहतुक करुन देण्यासाठी तडजोडअंती प्रत्येक मालवाहु ट्रकचे ३५,०००/–रू. प्रमाणे एकुण ६ ट्रकचे २,१०,०००/– रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून ला.प्र.वि., ठाणे युनिट यांनी दिनांक ०९/०१/२०२६ रोजी सापळा कारवाईचे आयोजन करून लोकसेवक भगवान जयराम भोईर, परिमंडळ वनअधिकारी यांना तक्रारदार यांच्याकडुन बागेचा पाडा, खर्डी–वाडा रोडवर चंदनपार्कसमोर येथे पंचासमक्ष २,१०,०००/–रुपये लाच स्विकारल्यावर लाच रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. |

मार्गदर्शन अधिकारी :– १) श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
२) श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
३) श्री. भागवत सोनवणे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.

---

लाचलुचपत प्रतिंबधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवका संबंधी काही तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र ठाणे यांचेशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– ला.प्र.वि., ठाणे युनिट, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
सकेतस्थळ :– **acbmaharashtra@mahapolice.gov.in**
ई–मेल :– **spacbthane @mahapolice.gov.in**
ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :– **acbmaharashtra.net**
टोल फ्रि नंबर :– १०६४
दुरध्वनी क्रमांक :– ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉट्सॲप क्रमांक :– ९९३०९९७७००/९७६९६९१०६४

Bjadhav 09/01/26

( भारत एकनाथ जाधव )
पोलीस उप अधिक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.

पोलीस उप अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे